महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

# जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ

कुडाळ तहशिलदार कार्यालय समोर, तालुका कुडाळ,
जिल्हा सिंधुदुर्ग, पिन कोड नं. ४१६ ५२०

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन | NATIONAL HEALTH MISSION राष्ट्रीय स्वास्थ्य मिशन | सत्यमेव जयते Government of Gujarat

दूरध्वनी क्रमांक (०२३६२)-२९९४३४ | Email Address :- dwchsindhudurg@gmail.com


बेटी बचाव, बेटी पढाव | कागद वाचवा, वृक्ष वाचवा

जा.क्रं./जिमबालरुकु/भांडार/साहित्य खरेदी/ 889 /२०२६
दिनांक :- 16 /०३/२०२६

## दरपत्रक मागणी

वैद्यकीय अधिक्षक वर्ग - १ , जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ या रुग्णालयाकरीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात खालील प्रमाणे Refrigerator and Air Conditioner खरेदी करण्याचे आहे तरी Refigerator and Air conditioner चा पुरवठा करण्यास इच्छुक पुरवठादार यासंकडून खालील तपशीलात नमूद केल्याप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| Sr. No. | Particulars | Quantity | Rate (Per Unit) in Rupees. |
|---|---|---|---|
| १ | Refrigerator, Hot Zone ११० Liters<br>Make - LG or Samsung | ०१ | |
| २ | Air Conditioner - १.५ ton ५ Star Split Invertor AC<br>Make - Voltas or LG or Carrier | ०१ | |

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ७ दिवसाच्या मुदतीत दिनांक २४/०३/२०२६ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यत विहित नमून्यात परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाद्वारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रकाची छाननी करुन अटी व शर्ती पूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकाला पुढील आदेश देण्यात येईल.

दरपत्रक भरण्यापूर्वी खालील सूचना, अटी व शर्ती काळजी पूर्वक वाचाव्यात.

# अटी व शर्ती

१. संपूर्ण दरपत्रक अथवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. वैद्यकीय अधिक्षक वर्ग १, जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ यांनी राखून ठेवलेला आहे.
२. दिनांक १७/०३/२०२६ ते २४/०३/२०२६ या कालावधीत ठिक ४.०० वाजेपर्यत कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफा पध्दतीने दरपत्रके स्विकारण्यात येतील.
३. इच्छुक पुरवठाधारकांनी मोहोर बंद दरपत्रके दिनांक २४/०३/२०२६ रोजी संध्याकाळी ४.०० पूर्वी जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ या कार्यालयात सीलबंद लखोटयामध्ये सादर करावे. त्यानंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रकाच्या लखोटयावर "Refrigerator and Air Conditioner **ची खरेदी करण्यासाठी दरपत्रक**" असे नमूद करावे. डाव्या बाजूस पुरवठादार संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता शिक्यासहित ठळकपणे नमूद करावे.
४. दरपत्रक **"मा. वैद्यकीय अधिक्षक वर्ग १, जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ"** या नावाने सादर करावे.
५. दिनांक २५/०३/२०२६ रोजी संध्याकाळी ४.० वाजता वैदयकीय अधिक्षक, जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ यांच्या दालनात खरेदी समिती समक्ष दरपत्रके उघडण्यात येतील.
६. दरपत्रक सादर करतेवेळी दरपत्रकासोबत खालील कागदपत्राची झेरॉक्स जोडायची आहे-

A. संस्था नोंदणी प्रमाणपत्र / शॉप ॲक्ट लायसन्स
B. उद्यम नोंदणी प्रमाणपत्र
C. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र
D. पुरवठादाराचे पॅन कार्ड
E. पुरवठादाराचे आधारकार्ड
F. बॅक पासबुकच्या पहिल्या पृष्ठाची खाते क्रंमाक स्पष्ट दिसेल अशी झेरॉक्स प्रत

**७. नमूद दर हे सर्व प्रमारच्या करासहित तसेच या कार्यालयास पोच करावयाच्या वाहतूक खर्चासहित सादर करावेत. त्या व्यतिरीक्त अन्य कोणतेही दर अदा केले जाणार नाही.**
८. दरपत्रकात नमूद केलेले दर हे बाजार भावापेक्षा जास्त नसावे.
९. कराराच्या सर्व अटी व शर्तीनुसार वस्तूची खात्री झाल्यानंतरच व अनुदान उपलब्ध झाल्यानंतरच देयकाची अदायगी करण्यात येईल.
१०. साहित्याचा दर्जा हा उत्कृष्ट असावा. दरपत्रक स्वीकृत झाल्यापासून सात दिवसात पुरवठा करावयाचा आहे.
११. मंजूर दरपत्रकानुसार साहित्य पोंच झाल्यावर सर्व करासहित देयक त्वरीत कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. संबधीत मक्तेदाराच्या बॅकखातेवर रक्कम जमा करण्यात येईल.
१२. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

१३. पुरवठा आदेशानुसार विहित कालावधीत साहित्याचा पुरवठा न झाल्यास किंवा पुरवठा केलेले साहित्य निकृष्ठ दर्जा असल्याचे आढळून आल्यास ते साहित्य बदलून पुन्हा नविन देणे बंधनकारक राहील.

१४. इच्छुक पुरवठाधारकाने सोबत सादर केलेल्या नमुन्यातील बंधपत्र संबंधित पुरवठाधारकाच्या लेटरहेडवर लिहून सादर करावे.

वैद्यकीय अधिक्षक, वर्ग-१
जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ
जिल्हा सिंधुदुर्ग

दरपत्रकाची नोटीस प्रसिध्दीचे स्थळ -

१. या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
२. www.nrhm.maharashtra.gov.in
३. www.arogya.maharashtra.gov.in

# बंधपत्र

मी / आम्ही गांभीर्य पूर्वक नमूद करतो की मी / आम्ही वर नमूद केलेल्या साहित्य पुरवठा आणी कामाच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून या निविदेसाठी माझे / आमचे दर निविदेसोबत असलेल्या प्रपत्र मध्ये नमूद करीत आहे / आहोत.

जर माझी / आमचे दरपत्रक स्वीकृत करण्यात आले तर निविदामधील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तीचा मी / आम्ही भंग केल्यास या दरपत्राकातील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशीलनुसार मी / आम्ही दंडनीय कार्यवाहीस पात्र राहू.

मी / आम्ही दरपत्रकात दिलेल्या साहित्य पुरवठा प्रपत्र मधील तपशीलनुसार अट १ ते १४ करीता बांधील राहू.

वरील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहे.

स्थळ -

दिनांक -

दरपत्रकधारकाची सही व शिक्का -

नाव -

पत्ता -